<u>शपथेवर पुढील सरतपास- तक्रारदारातर्फे विधिज्ञ श्री. टी.एन. जमदाडे यांचेकडून</u>

**१२.** मी जाबदेणार क्रमांक १ व ३ यांनी दिलेली लेखी कैफियत वाचलेली आहे. त्यातील मजकूर चुकीचा असून तो मला मान्य नाही.

**१३.** मी यादी नि.क्र. यु-२५ अ.क्र. १ वर मला जाबदेणार क्रमांक १ यांनी दिनांक २९/०१/२०१६ रोजी दिलेले मूळ नेमणूक पत्र, अ.क्र. २ वर मला सेवेत कायम केल्याबाबत जाबदेणार क्रमांक २ यांनी दिनांक १३/०२/२०१७ रोजी दिलेले मूळ पत्र व अ.क्र. ३ वर दिनांक १९/०५/२०१६ रोजी माझी बदली अब्दुललाट शाखेत केल्याचा मूळ आदेश अशी कागदपत्रं दाखल केलेली आहेत. सदर कागदपत्रांना **निशाणी क्रमांक यु-२६ ते यु-२८** देण्यात येतो.

**१४.** मी यादी नि.क्र. यु-४ अ.क्र. ४ वर दिनांक ११/१२/२०१८ रोजी माझे विधिज्ञांमार्फत जाबदेणार बॅंकेस दिलेल्या नोटीसीची स्थळप्रत दाखल केलेली असून त्यावर माझी व माझे विधिज्ञांची सही आहे. त्यातील सर्व मजकूर खरा व बरोबर आहे. सदर नोटीसीस **नि.क्र. यु-२९** देण्यात येतो. अ.क्र. ५ वर जाबदेणार बॅंकेने दिनांक १९/१२/२०१८ रोजी विधिज्ञांमार्फत माझे नोटीसीस पाठवलेले उत्तर दाखल केलेले आहे. सदर उत्तर नोटीस **नि.क्र. यु-३०** देण्यात येतो. अ.क्र. ६ वर मी माझे विधिज्ञांमार्फत जाब देणार बॅंकेच्या नोटीसीच्या उत्तरास दिलेले प्रतिउत्तर दाखल केलेले आहे. त्यावर माझी व माझे विधिज्ञांची सही आहे. त्यातील सर्व मजकूर खरा व बरोबर आहे. सदर नोटीसीस **नि.क्र. यु-३१** देण्यात येतो. अ.क्र. ७ वर मी जाबदेणार बॅंकेस मला कामावर हजर करुन घेणेबाबत दिनांक २८/१२/२०१८ रोजी दिलेले पत्र दाखल केलेले आहे. त्यावर माझी

सही आहे. त्यातील सर्व मजकूर खरा व बरोबर आहे. सदर पत्रास **नि.क्र. यु-३२** देण्यात येतो. तसेच अ.क्र. ९ वर पोस्टाची मूळ पोहच पावती दाखल केलेली आहे. त्यास **नि.क्र. यु-३३** देण्यात येतो. अ.क्र. ८ वर जाब देणार बॅकेत दिनांक ३१/१२/२०१८ रोजी मला दिलेले पत्र दाखल केलेले आहे. त्यास **नि.क्र. यु-३४** देण्यात येतो.

**१५.** मी यादी नि.क्र. यु-१८ अ.क्र. १ वर उपनिबंधक (नागरी बॅका) यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था कलम १०७ प्रमाणे अवसायक यांचेविरुध्द दावा दाखल करण्यास परवानगी नाकारली असल्याबाबत मला दिलेले मूळ पत्र दिनांक १३/१२/२०२४ दाखल केलेले आहे. त्यास **नि.क्र. यु-३५** देण्यात येतो.

**उलटतपास -जाबदेणार क्रमांक १ ते ३ यांना पुकारले असता गैरहजर, करिता उलटतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**सही/-**

कोल्हापूर. (मधुरा आ.मुळीक)
दि. २१/११/२०२५ न्यायाधीश,
कामगार न्यायालय,क्र.१, कोल्हापूर.

**<u>नि.क्र. सी–२४ वरील आदेशान्वये तक्रारदाराचा शपथेवर उलटतपास–</u>**
**<u>जाबदेणार क्रमांक १ ते ३ तर्फे विधिज्ञ श्री. एन. व्ही. जंगम यांचेकडून</u>**

**१६.** माझे शिक्षण बी.ई. (कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरींग) असे झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे शिक्षण व्यवसायिक स्वरुपाचे आहे. माझी जाबदेणार बॅंकेत इ.डी.पी. इनचार्ज म्हणून नेमणूक झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. यु–२६ वरील आदेशान्वये माझी नेमणूक संगणक तज्ञ म्हणून करण्यात आली होती. त्यावेळी मला रुपये ११,०००/– दरमहा पगार होता. हे म्हणणे खरे आहे की, मला सेवेत कायम केल्याच्या आदेशात माझा दरमहा पगार रुपये १५,०००/– नमूद केला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझा शेवटचा पगार रुपये १६,१५५/– इतका झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी जाबदेणार बॅंकेत ऑफीसर म्हणून काम करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझा कामाचा हुद्दा, कामाचे स्वरुप व मला मिळणारा पगार यावरुन मी कामगार या व्याख्येत समाविष्ठ होत नाही.

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार बॅंक ही सहकारी बॅंक आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर बॅंकेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीप्रमाणे चालते. हे म्हणणे खरे आहे की, बॅंकेत काम करत असताना बॅंकेचे पोटनियम सर्व कर्मचा–यांना बंधनकारक असतात. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार बॅंक सहकारी संस्था असल्याने ती ना–नफा ना–तोटा या तत्वावर चालते. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार बॅंक रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडियाकडून परवाना घेवून बॅंक व्यवसाय करते. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार बॅंक बॅंकींग व्यवसायाव्यतिरिक्त इतर कोणताही व्यवसाय करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार बॅंक ही उद्योग नाही. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार बॅंकेचा बॅंकींग

परवाना रद्द होवून त्यावर अवसायक नेमले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नियुक्त अवसायकामार्फत संस्थेचे कामकाज गुंडाळण्याचे सुरु आहे. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार बॅक अवसायनात गेल्यामुळे कर्मचा-यांची सेवा समाप्त करुन त्या ठिकाणी कंत्राटी स्वरुपाचे कर्मचारी नेमून अवसायनाचे काम सुरु आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर कंत्राटी स्वरुपाच्या कर्मचा-यांना कोणताही पी.एफ., रजा वेतन व बोनस इत्यादी लाभ दिले जात नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी ऑफीसर म्हणून काम करत होतो त्यामुळे मी या न्यायालयात दाद मागू शकत नाही.

**१८.** मी बॅकेच्या मुख्य कार्यालयात २ वर्षे काम केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या ठिकाणी काम करत असताना मला कधीही मेमो दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कामाच्या उपलब्धतेप्रमाणे माझी दिनांक १९/०५/२०१८ च्या आदेशाने अब्दुललाट शाखेत बदली झाली होती. त्यानंतर मी माहे नोव्हेंबर २०१८ पर्यंत त्या ठिकाणी काम केले व कामाचा पगार घेतलेला होता. माझी बदली केल्याबद्दल मी जाबदेणार यांच्याकडे तक्रार केली होती. हे म्हणणे खरे आहे की, तशी तक्रार केली होती हे दाखविणारी कागदपत्रं मी प्रस्तुतकामी हजर केली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, तशी मी लेखी तक्रार न केल्याने त्याबाबतची कागदपत्रं प्रस्तुतकामी दाखल केली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मला सेवेत कायम केल्याच्या पत्रात सेवेच्या अटी व शर्ती बदलल्याबाबत बॅकेने काही नमूद केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या कामातील चुकांबद्दल माझे वरिष्ठ मला तोंडी सुचना देत होते. हे म्हणणे खरे नाही की, मला वरिष्ठांनी वेळोवेळी सुचना देवूनही माझ्या कामकाजामध्ये सुधारण झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या कामकाजात सुधारणा होत नसल्याने जाबदेणार बॅकेने दिनांक २९/११/२०१८ रोजीची कारणे दाखवा नोटीस मला दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतरही मी दिनांक ३०/११/२०१८ पासून कामकाजाचे ठिकाणी

हजर होण्यास आलो नाही. मला सेवेतून बडतर्फ केल्याचा लेखी आदेश दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कामावर हजर न राहता दिनांक ११/१२/२०१८ रोजी खोटया मजकुराची नोटीस जाबदेणा–या बॅकेस दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे नोटीसीस जाबदेणार बॅकेने दिनांक १९/१२/२०१८ रोजी उत्तर दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर उत्तरात मी कामावर येत नसल्याचे जाबदेणार बॅकेने नमूद केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी कामावर हजर न राहता दिनांक २४/१२/२०१८ ची नोटीस जाबदेणार बॅकेस दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा पुरावा तयार करण्यासाठी दिनांक २४/१२/२०१८ रोजीचे नोटीस जाबदेणार बॅकेस दिली होती.

**१९.** हे म्हणणे खरे आहे की, माझे कामाचे शेवटचे ठिकाणी शाखा अब्दुललाट हे होते. मी अब्दुललाट शाखेच्या शाधाधिका–यास मला कामावर हजर करुन घ्या अशा आशयाचे पत्र दिलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी मुख्य शाखेतील व्यवस्थापक अथवा चेअरमन यांना मला कामावर हजर करुन घेण्याबाबत पत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. यु–३१ वर दाखल केलेले पत्र पोकळ असून त्यावर बॅकेची पोहच नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०१/१२/२०१८ पासून मला बॅकेत हजर राहू नका असे कोणीही सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मला कामात स्वारस्य नसल्याने दिनांक ०१/१२/२०१८ पासून मी स्वत:हून कामावर हजर राहिलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार बॅकेत १२० कर्मचारी कार्यरत होते हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही.

**२०.** मी सध्या व्यंकटेश्वरा सहकारी बॅकेत आयटी मॅनेजर म्हणून काम करत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शैक्षणिक पात्रतेनुसार मला ते काम दिलेले आहे. सदर बॅकेत मी दिनांक १७/१०/२०२० पासून काम करत आहे. हे म्हणणे

**निशाणी यु–७**

खरे नाही की, मी सन २०१९ पासून सदर बॅकेत काम करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुतची खोटया व चुकीच्या मजकुराची तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुराव्याच्या शपथपत्रातील सर्व कथने खोटी व चुकीची आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी शपथेवर खोटा जबाब देत आहे.

**उलटतपासणी पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**सही/–**

कोल्हापूर.
दि. २१/११/२०२५

(मधुरा आ.मुळीक)
न्यायाधीश,
कामगार न्यायालय,क्र.१, कोल्हापूर.